अनुदानीत

पुणे जिल्हा परिषद,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक) ३०४
जा.क्र.जि.प शिक्षण/प्राथ/खाप्राशा/६३५/२०१७
पुणे-दिनांक - २८ /०३/२०१७

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
**आदिवाशी शिक्षण संस्था संचलित हुतात्मा राजगुरू विद्यालय राजगुरूनगर ता.खेड जि.पुणे.**

**विषय** - बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ याचा पोट नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणे बाबत.

आपला अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळांनी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे मी शिक्षणाधिकारी **(प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद , पुणे** दिनांक **१ एप्रिल २०१६** पासुन दिनांक **३१ मार्च २०१९** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता ५ वी ते ८ वी** च्या वर्गाकरिता **आदिवाशी शिक्षण संस्था संचलित हुतात्मा राजगुरू विद्यालय राजगुरूनगर ता.खेड जि.पुणे.** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे :-

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन ) शाळा पालन करील.

३. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहील्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था / शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या माता -पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पूराव्याच्या अभावी, धर्म,जात किंवा वंश , जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार). प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

(आठ). शिक्षकाने/ शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत :ला गुंतवुन घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करेल.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमानेच शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ **१३०८.३२ चौ मी**
- एकुण बांधकामाचे क्षेत्र :- **६६० चौ मी**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- **१३०८.३२ चौ मी**
- वर्ग खोल्यांची संख्या :- १२
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली :- १
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? :-

| . | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास | ०२ | ०१ |
| मुताऱ्या | १० | ०४ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा :- होय
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर :- होय
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामग्री /ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध :- आहे (पुस्तकसंख्या १५०० , नियतकालीके - , वर्तमानपत्रे-१)

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विवस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या ,गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्र तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक माध्य/अनु/म./एस.एस.सी/केएचडी / 304 /२०१६-१७ असा आहे. तसेच आपल्या शाळेचा U-DISE No २७२५०८००१०६ हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

१७. मा.शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

शिक्षणधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद.पुणे

TRUE COPY

HEAD MASTER
Hutatma Rajguru Vidyalaya
Rajgurunagar, Tal. Khed, Dist. Pune

मुख्याध्यापिका
हुतात्मा राजगुरु विद्यालय

TRUE COPY

HEAD MASTER
Hutatma Rajguru Vidyalaya
Rajgurunagar, Tal. Khed, Dist. Pune

TRUE COPY

मुख्याध्यापक
हुतात्मा राजगुरु विद्यालय
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे

अंतरीचा ज्ञानदीप मालवू नको रे !

स्थापना - ७ जून १९७१

आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर संचालित,



# हुतात्मा राजगुरू विद्यालय

राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे. ४१०५०५.

मान्यता क्र : SI/NS/PR/Poona/Date 23 Dec.1971

PAY UNIT Code No.PN/KD/393

S.S.C.BOARD SCHOOL No.11.08.013

युडायस नंबर : २७२५०८००१०६

जावक क्र. ५७/२३-२४ HRV

दि. ०४ / ११ / २०२३

## हमीपत्र

प्रति,
मा.शिक्षणाधिकारी सो.(प्राथ.)
पुणे जिल्हा परिषद पुणे

विषय — मुळ कागदपत्रे नसले बाबतचे हमी पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये हमीपत्र देण्यात येते की,आमच्या हुतात्मा राजगुरू विद्यालय राजगुरूनगर ता.खेड,जि.पुणे. या विद्यालयाची सन—२०२२ ते २०२५ या वर्षाची स्व—मान्यता प्रस्ताव ऑनलाईन आपल्या कार्यालयाकडे सादर करत आहोत. आमची आदिवासी शिक्षण संस्था जुन्नर ता.जुन्नर जि.पुणे व विद्यालयाची स्थापना फार पूर्वीची (१९७१) असून आमचे विद्यालयातील अभिलेखात मूळ कागदपत्रे उपलब्ध नाहीत. त्यामुळे शालेय उपलब्ध दस्तऐवजावरून मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्स सत्यप्रती आपल्या कार्यालयास सादर करत आहोत. कृपया माहितीचा स्विकार व्हावा ही नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

मुख्याध्यापक
हुतात्मा राजगुरू विद्यालय
राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे